# आरती श्री अनघा-दत्ताची

तू दत्त मधुमती
ती अनघा पार्वती
तू एक त्रिमूर्ति
अर्धांगिनी तव ती
ओवाळीन आरती
लावून प्राणज्योती ॥धृ.॥

तू पूर्ण पुरूष
ती पूरक प्रकृती
तिचा तू आधार
ती तुझी शक्ती
ओवाळीन आरती
लावून प्राणज्योती ॥१॥

तू पालक जनक
ती पोषक जननी
गर्व मज सार्थ
बालक तुमचा मी
ओवाळीन आरती
लावून प्राणज्योती ॥२॥

- नारायण
०८/०८/२०